# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे सन २०१६-१७

## विशेष फेरी-२ प्रसिध्दी निवेदन

दि.२०.०८.२०१६.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे इयत्ता ११वी चे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहेत.

वेळापत्रकानुसार विशेष फेरी २ ची गुणवत्ता यादी सोमवार दि २२.०८.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रसिध्द करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी या यादीतील प्रवेश वेळापत्रकानुसार सोमवार दि. २२ व २३ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत प्रवेश घ्यावेत.

विशेष फेरी -२ मधील प्रवेशाची माहिती पुढीलप्रमाणे :-

| अ. .क्र. | शाखा | विशेष फेरी-२ साठी रिक्त जागा | विशेष फेरी-२ साठी प्राप्त अर्ज | विशेष फेरी-२ साठी प्रवेश दिलेले |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कला (मराठी) | ३१४७ | १५९ | १५६ |
| २ | कला (इंग्रजी) | २९५३ | १५६ | १२५ |
| ३ | कॉमर्स (मराठी) | १७८५ | ५६८ | ४८६ |
| ४ | कॉमर्स (इंग्रजी) | ४००५ | १५४१ | ८४९ |
| ५ | विज्ञान (इंग्रजी) | ६७१५ | १९२८ | १२७२ |
| एकुण | | १८६०५ | ४३५२ | २८८८ |

विशेष फेरी-२ मधील अॅलोकेशन झालेल्या ४३५२ विद्यार्थ्यांपैकी पहिल्या पसंती क्रमांकाचे १२११ विद्यार्थ्यांना व ५०९ विद्यार्थ्यांना दुस-या पसंती क्रमांकाचे कनिष्ठ महाविद्यालये मिळालेले आहेत.

**तिसरी विशेष फेरी चे सविस्तर वेळापत्रक नंतर जाहीर केले जाईल याची नोंद घ्यावी.**

### विशेष फेरी-२ मधील विद्यार्थ्यांसाठी सूचना :-

१) इ. ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर आपला ऑनलाईन अॅप्लीकेशन फॉर्म क्रमांक टाकुन कोणते कॉलेज मिळाले आहे ते पाहावे.

२) विशेष फेरी-२ मधील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे महाविद्यालयात सादर करुन दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश निश्चित करावा. (दि. २२ व २३ ऑगस्ट २०१६ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत ) कोणत्याही परिस्थितीत वेळ वाढवून दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरचे प्रसिध्दीपत्रक इ. ११वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या http://pune.fyjc.org.in या संकेतस्थळावर व शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१